Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-11 | Dec-2014
Available online at www.isrj.org

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय जल नीती

प्रामिलिंद नारनवरे .

अर्थशात्र विभाग , बिकॉलेज.एन.एन ., भिवंडी ,जि(.रा .म) ठाणे .

**सारांश:**

ब्रिटीश भारतात निरनिराळया प्रांतात नद्याला येणाऱ्या पुरामुळे नागरिकांची जीवितहानी व आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात होत असे. भारतातील या जल समस्येविषयी विविध तज्ञांचे निरनिराळे मत होते. यावर काहींनी उपाय योजना सुचविल्या व त्या काही प्रमाणात अंमलात आणल्या गेल्या. परंतु पुरामुळे होणाऱ्या नागरिकांच्या समस्या कमी होऊ शकल्या नाही. यावर कायमस्वरूपी उपाय योजना करणे नितांत आवश्यक होते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात १९४२ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लिनलिथगो व्हाईसरॉय एक्झेक्यूटीव्ह कौन्सील चे सदस्य म्हणून नियुक्ती झाली. २० जुलै १९४२ ते जून १९४६ या कार्यकाळात डॉ. आंबेडकर मजूर, सार्वजनिक बांधकाम, उर्जा, जलसंपदा, उद्योग, नियोजन इत्यादी खात्याचे कॅबिनेट मंत्री होते. भारतातील पहिली १५ मोठी धरणे बांधण्याचे 'संकल्पचित्र' (Blueprint) त्यांनी तयार केले. जलसंपत्तीच्या माध्यमातून धरणाची निर्मिती करणे, पुर समस्येवर त्यामुळे मात करता येईल जेणेकरून आर्थिक नुकसान व जीवितहानी टाळता येईल, धरणाच्या माध्यमातून शेतीचा व जलउर्जेचा विकास होईल; ज्यामुळे अन्नधान्याचा व विजेच्या उत्पादनात वाढ होईल आणि त्यामुळे औद्योगिकरणाला चालना मिळेल, शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी होईल याचा परिणाम भारतातील गरिबी व दारिद्रिय निर्मुलनावर होईल. राष्ट्राचा विकास घडवून आणणे हे ध्येय नजरेसमोर ठेऊन या सर्व क्षेत्रात डॉ. आंबेडकर यांनी आधुनिक भारताच्या जल, नियोजन व उर्जा नीतीच्या माध्यमातून भारताच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या व प्रगतीचा पाया रोवला.

**बीजशब्द:**

भारतीय जल समस्या,भारतीय जल समस्येविषयी परंपरागत दृष्टीकोन व एकउद्देशीय योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टीकोन व बहुउद्देशीय योजना, प्रमुख संघटनांची निर्मिती, जल नीती अंमलात आणतांना समस्या, समस्येचे निराकरण व १९३५च्या कायद्याबाबत (प्रांत व केंद्र सरकार यांच्या अधिकाराबाबत) मत, जल नितीविषयी मुख्य व उप उद्धीष्ट्ये, दुसऱ्या महायुद्धातील युद्धोत्तर आर्थिक (पुनर्रचना) योजना, जलउर्जा धोरण व नियोजन, दामोदर नदी हिराकुंड नदी, सोन नदी इत्यादी खोरे योजना. भारतीय संविधानात तरतूद.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे१९२७ ते १९३९ या कालावधीत बॉम्बे विधानपरिषदेचे (BLC) व बॉम्बे विधानसभेचे (BLA) सदस्य म्हणून कार्यरत असतांना अत्यंत महत्वपूर्ण कार्य केले. त्याचबरोबर डॉ.आंबेडकरांची लोकशाही समर्थनार्थ व हुकुमशाही विरोधी सैद्धांतिक भूमिका व कृती; त्याची विद्वत्ता, दूरदृष्टी व देशप्रेम यांची दखल घेऊन युद्ध मंत्रिमंडळ समितीने (War Cabinet, Committee) ११ मे १९४२ मध्ये गव्हर्नर जनरल च्या एक्झेक्यूटीव्ह कौन्सील मधील नियुक्तीला मंजूरी दिली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात डॉ. आंबेडकर यांची लिनलिथगो व्हाईसरॉय एक्झेक्यूटीव्ह कौन्सील चे सदस्य म्हणून २० जुलै १९४२ रोजी नियुक्ती झाली. त्याआधी नोव्हेंबर १९३७ मध्ये श्रम विभागाची स्वतंत्र निर्मिती करण्यात आली. जलसिंचन, उर्जा (विद्युत) आणि इतर संबंधित सार्वजनिक बांधकाम इत्यादी विषयांचे निर्माण झालेले खाते श्रम विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले. जुलै१९४२ मध्ये डॉ. आंबेडकर यांनी श्रम खात्याचा कार्यभार स्वीकारला तेव्हा जलसिंचन आणि विद्युत(उर्जा) विकास करणे हि श्रम विभागाची महत्वाची जबाबदारी होती.

**भारतीय जल समस्या:**

ब्रिटीश काळात भारतात जल समस्येचे स्वरूप गंभीर होते. नद्यांचे पात्र हे प्रचंड रुंद असल्यामुळे पावसाळयात नद्यांना मोठ्या प्रमाणात पूर येत असे.त्यामुळे लोकांची जीवित हानी व आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणावर होत असे. बिहार व पश्चिम बंगाल मधील बाराकर, दामोदर, हुगळी या नद्या, ओरिसामधील महानदी, मध्यप्रदेशातील सोन नदी,इत्यादी नद्यांना मोठ्या प्रमाणात पूर येत असे. त्यामुळे यांवर उपाय योजना आवश्यक होत्या.

नैसर्गिक विध्वसंक प्रवृतीमुळे दामोदर नदीला 'दुःखाची नदी' या टोपण नावाने ओळखले जात असे. १९०७, १९०९, आणि १९११ च्या महाभयंकर पुरामुळे काही उपाय योजना राबविल्या गेल्या. परंतु १९१३ मध्ये दामोदर नदीला महाभयंकर पूर आला आणि परिस्थिती अत्यंत गंभीर झाली होती. दामोदर नदीला मिळणारी 'बाराकार' हि उपनदी होती. त्यामुळे दामोदर व बाराकार नद्यांच्या काठावर तळयांचे नियंत्रण ठेवणे, देखभाल करणे, दुरुस्ती करणे इत्यादी उपायांवर भर देण्यात आला. १९३२ मध्ये तत्कालीन सरकारने पाण्याची उंची वाढावी म्हणून रोडा येथे मोठी आडवी भिंत बाधण्यात आली, जी 'अन्डोर्सन' या नावाने ओळखली जात होती. परंतु हि उपाय योजना पुरेशी नव्हती.

जुलै १९४३ मध्ये पुरामुळे दामोदर नदीच्या डाव्या भरावाला चीर पडली. परिणामी आजू- बाजूचा भाग सहा ते सात फूट पाण्याखाली गेला. अनेक गावे पूरग्रस्त व उद्ध्वस्त झाली, रेल्वे लाईन्स तुटल्या. वाहतुकीची सोय वेगळया मार्गाने करावी लागली. कलकत्ता शहराचा भारतापासून संपर्क तुटला होता आणि सर्वसाधारण जीवन उद्ध्वस्त झाले होते. सर्व माध्यमे, वाहतूक, रेल्वे मुख्यालय, १४ बी आर्मीचा संपर्क काही दिवसांकरिता तुटला होता. महायुद्धाच्या कालावधीत सर्व संरक्षणव्यवस्था विस्कळीत झाली होती. त्यामुळे युद्धाच्या तयारीच्या काळात प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागला.१

दामोदर नदीच्या तीव्र धक्क्यामुळे भारताच्या मध्यवर्ती सरकारला परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आले. या संदर्भात वेळ वाया न घालविता निश्चित स्वरूपाचे नियोजन करून प्रभावी योजना राबविणे आवश्यक भासले.

**भारतीय जल समस्येविषयी परंपरागत दृष्टीकोन व एकउद्देशीय धोरण :**

ब्रिटीश काळात भारतीय जल समस्येच्या प्रश्ना संदर्भात अनेकांनी उपाय योजना सुचविल्या. सुरुवातीपासून ते आतापर्यंतच्या विचारप्रक्रियेत, दृष्टीकोनात अतिरिक्त पाणी हेच प्रमुख समस्या म्हणून विचारात घेतले होते. यात जे उपाय सुचविले गेले त्याचे स्वरूप **एकउद्देशीय** होते, ते केवळ **'पूरनियंत्रण'** या नावाने होते. ओरिसामधील विविध समित्यांनी पुराच्या प्रश्नाविषयी चर्चा केली. त्याचा सखोल अभ्यास केला. नदीच्या किनाऱ्यावर भराव बांधून अतिरिक्त पाणी समुद्रात सोडून देणे व पूरनियंत्रण करणे अशी उपाय योजना पूर समस्येवर निरनिराळया समित्यांनी सुचविल्या होत्या. या समित्यांचा केवळ **'पूरनियंत्रण' या एकउद्देशीय** दृष्टिकोनावर विश्वास होता. ओरिसातील नद्यांच्या विकासावरील अधिवेशनात १८७२ मधील प्रथम समितीपासून १९४५ च्या ओरिसा पूर सल्लागार समितीपर्यंत विविध समित्यांनी सुचविलेल्या शिफारशींचा डॉ.आंबेडकरांनी उल्लेख केला. या विविध समित्यांनी सुचविलेल्या उपायांच्या मर्यादा त्यांनी दाखविल्या. त्यांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे-

"मला सांगायला खेद वाटतो की, विविध समित्यांच्या सन्मानीय सदस्यांना या समस्येवर मात करण्यासाठी योग्य दृष्टीकोन आणता आला नाही. त्यांच्या मते अतिरिक्त प्रमाणातील पाणी ही आपत्ती होती. ज्यावेळी पाणी प्रचंड प्रमाणात येईल, तेव्हा असे प्रयत्न करावे की, जेणेकरून नदीचा प्रवाह समुद्रामध्ये व्यवस्थित पोहोचेल."

**डॉ. आंबेडकरांचा जल समस्येविषयी दृष्टीकोन व बहुउद्देशीय धोरण:**

डॉ. आंबेडकर हे जलसंपतीचा उपयोग आणि जलसंवर्धन यांविषयी गंभीर होते. कोणत्याही समस्येचा मुळापासून ते अभ्यास करीत असतांना सर्व दृष्टीकोनातून विचार करीत आणि सत्य परिस्थितीचा शोध घेत असत.

डॉ. आंबेडकरांच्या मते, मनुष्य अतिरिक्त पाण्यापेक्षा त्याच्या अभावामुळे अधिक त्रास सहन करतो. जल हि संपत्ती आहे,या वस्तुस्थितीत बदल करता येत नाही. जल हि सर्व लोकांची संपत्ती आहे आणि तिचे वितरण निश्चित झाले पाहिजे. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महापुराच्या किंवा पाण्याच्या अतिरीक्ततेच्या समस्येकडे वेगळया दृष्टीने पहिले आणि जलसमस्येच्या सकारात्मक आणि महत्वपूर्ण घटकांवर अधिक लक्ष दिले.

पूर समस्येविषयी भारतातील विविध समित्यांचे मत आणि एक उद्देशीय दृष्टीकोन त्यांच्यात आणि डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीकोनात मतभेद होते. डॉ. आंबेडकरांनी स्पष्टीकरण दिले कि, "जनतेच्या भल्यासाठी जर पाण्याचे जतन व संवर्धन करणे अत्यावश्यक असेल तर नदीकिनारे बंदिस्त करण्याचा विचार गैर ठरतो. या संदर्भात विकसित देशांनी अंगीकारलेला मार्गच योग्य आहे आणि तो म्हणजे विविध ठिकाणी पाण्याचे जतन करणे आणि त्याचा बहुउद्देशीय वापर करणे. अशा तळयांचा धरणे बांधून जलसिंचनाशिवाय विद्युतशक्ती निर्माण करण्यासाठी आणि नौकानयन(जलवाहतूक) यासाठी वापर करता येतो. नद्यांचा वापर नौकानयन हेतूसाठी करण्यावर त्यांनी विशेषत्वाने भर दिला. यासंदर्भात ८ नोव्हेंबर १९४५ च्या ओरिसातील नद्यांवरील अधिवेशनात स्पष्ट केले की,

"भारतातील नौकानयनाला त्याच्या यशापयशाचा खूप मोठा इतिहास आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या अंदाजपत्रकात सरकारचा सार्वजनिक उपक्रम म्हणून नौकानयनासाठी अतिमहत्वाची तरतूद होती. त्या धोरणाचाच उर्वरित भाग म्हणून नौकानयनासाठी असलेले अनेक कालवे आजही भारतात आहेत. लोहमार्गाचा विचार नंतर येतो. त्यावेळी लोहमार्ग (रेल्वे) आणि जलवाहतुकीसाठी धोरण या दोन्हीसाठी धोरण होते. १८७५ मध्ये त्यांच्यात व्यापक प्रमाणात विसंगती दिसून आली, त्यातून रेल्वे विरुद्ध कालवे अशी समस्या निर्माण झाली. सर आर्थर कॉटन कडून जोरदार संघर्ष लढले गेले होते. दुदैवाने रेल्वेचे समर्थक जिंकले. त्यांनी अधिक स्पष्ट केले की;

'मला रेल्वेच्या कालव्याविरोधातील विजयाचा वस्तुतः आनंद झाला नाही. रेल्वेच्या समर्थकांची काल्व्यच्या बाबतीतील विचारसरणी अपुरी होती.' कालवे पुढे जाऊ शकत नाहीत, कारण ते 'नफा' देऊ शकत नाहीत. कालवे नफा देऊ शकत नाहीत असे असेल तर त्याचे कारण ते नफा देऊच शकत नाहीत हे नसून त्यांच्याकडे होणाऱ्या दुर्लक्षात आहे. अंतर्गत नौकानयनाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या विषयाबाबतीत आपण जर्मनी आणि रशियाचे अनुकरण करू शकतो. केवळ आपल्या जुन्या कालव्यांचे पुनरुज्जीवनच नव्हे तर नवीन कालवेसुद्धा बनविणे आणि रेल्वेच्या निकडीमुळे अथवा आवश्याक्तेमुळे कालव्यांना कोणताही त्याग करावा लागणार नाही याची काळजी घेणे हेही करू शकतो."

जलसाठा योजनेबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वस्तुस्थिती स्पष्ट केली की, केवळ सिंचन आणि विद्युत नव्हे, तर अंतर्गत नौकानयनासाठी दूरवर जलमार्ग देखील पुरविता येईल. पाण्याच्या बहुउद्देशीय वापरामुळे त्याच्या संभाव्य वाईट परिणामांचे रुपांतर चांगल्या शक्तीमध्ये होते यांवर आंबेडकरांचा विश्वास होता. त्यांनी नंतर दामोदर , महानदी, सोन आणि इतर आंतर-राज्य नद्यांवरील प्रकल्पावर दिलेला भर हा सापेक्ष होता.

दामोदर खोरे प्रकल्पबाबत कलकत्ता येथील पहिल्या अधिवेशनात ३ जानेवारी १९४५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ठासून सांगितले की, दामोदर प्रकल्प हा बहुउद्देशीय प्रकल्प आहे. केवळ महापुरापासून निर्माण झालेली समस्या हाताळणे एवढाच त्याचा उद्देश नाही. त्यातून जलसिंचन, विद्युत आणि नौकानयनाची तरतूदसुद्धा असणार. **आपल्याकडील जलसंपत्ती विकासासाठी, असलेले धोरण हे बहुउद्देशीय धोरण आहे. त्यामध्ये पाणीवापराच्या सर्व शक्यतांचा समावेश करणे आवश्यक आहे.**

**१९३५ च्या कायद्यातील समस्या:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जलसिंचन आणि विद्युत उर्जा समितीचे अध्यक्ष होते. परंतु जलविषयक बहुउद्देशीय धोरण अंमलात आणतांना त्यांच्यासमोर अनेक अडचणी होत्या. मुख्य अडचण म्हणजे १९३५ च्या कायद्यानुसार सिंचन, नौकानयन व उर्जाविकास हे विषय केंद्र सरकारकडे नव्हते. या कायद्याने सिंचन, नौकानयन व उर्जाविकास हे विषय राज्यांच्या व प्रांतांच्या अखत्यारीत होते. १९३५ चा कायदा हा घटनादुरुस्तीचाच एक महत्वाचा भाग होता या कायद्यान्वये प्रांतीय स्वायतत्ता देण्यात आली होती. या कायद्याने सर्व नद्यांच्या पाणी वापराचे अधिकार संबंधित प्रांतांना व राज्य सरकारांना दिले आणि केंद्र सरकारचा सिंचन विकासाशी कोणताच संबंध राहिला नाही. या कायद्यामुळे केंद्र सरकारला या प्रकल्पाच्या विकासात हस्तक्षेप करणे, तसेच आंतर-राज्य खोरे प्रकल्प हाती घेणे अशक्य झाले. विजविकासासाठी, सिंचनविकासासाठी भारतात स्वतंत्र असे कार्यालय देखील नव्हते. वीजवापर, वितरण आणि सिंचनव्यवस्थापन याबाबतीत आकडेवारी उपलब्ध नव्हती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४२ मध्ये जेव्हा सिंचन आणि उर्जा खात्याचा पदभार स्वीकारला तेव्हा हीच परिस्थिती होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तत्कालीन प्रस्थापित व्यवस्थेवर ताशेरे ओढले. या व्यवस्थेत केंद्र सरकारला भारतीय जलधोरणाबाबत कोणताच अधिकार दिलेला नव्हता. १९३५ च्या कायद्याचा संदर्भ घेऊन ते म्हणतात, "खरे तर राज्याराज्यातून जाणारे रेल्वेमार्ग आणि जलमार्ग यात कोणताही फरक नसतो हे आपण लक्षात घेतले नाही. याउलट आपण रेल्वेमार्ग आणि जलमार्ग यात करण्यास संविधानात तरतूद केली आहे. त्यामुळे रेल्वेला आपण केंद्रीय म्हणतो तर जलमार्गाला प्रांतीय ठरवतो.

डॉ. आंबेडकरांना याची जाणीव होती की, केंद्र सरकारच्या हस्तक्षेपाशिवाय आणि वित्तीय मदतीशिवाय जलविकासाचे बहुउद्देशीय धोरण पूर्णत्वास येणार नाही. जलसिंचनाच्या बाबतीत प्रांतीय दृष्टीकोनातून विचार न होता तो राष्ट्रीय दृष्टीकोनातून व्हावा असे श्रम विभागाचे मत होते. परंतु दुर्दैवाने वित्तीय विभागाने १९३५ च्या कायद्याचा आधार देत केंद्र सरकारचा तो विषय नसल्यामुळे यात वित्तीय तरतुदीसाठी फारसा अनुकूल प्रतिसाद दिला. त्याच्या मते जलमार्गाच्या समस्या सोडविण्याची जबाबदारी प्रांतीय सरकारची आहे. शेवटी वित्तीय विभागाने जलसिंचन व मार्गदर्शन मंडळाच्या प्रस्तावाला मान्यता दिली; परंतु केंद्र सरकारची वित्तीय जबाबदारी फक्त पाच वर्षाची असेल, त्यानंतर मंडळाने केंद्र सरकारला वगळून इतर माध्यमांद्वारे निधी उपलब्ध करण्याची व्यवस्था करावी असे नमूद केले. श्रम विभागाने याला मात्र फारसा प्रतिसाद दिला नाही.

**डॉ.आंबेडकरांची उपाययोजना:**

डॉ. आंबेडकरांनी १९३५ च्या कायद्यातील समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन या अडचणी दूर करण्यासाठी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर प्रयत्न सुरु केले. पहिला उपाय म्हणजे १९३५ च्या कायद्यात घटनादुरुस्ती करणे हा होय; परंतु घटनादुरुस्ती करणे सोपे नव्हते आणि त्यात वेळेचा मोठा अपव्यय होणार होता. दुसरा उपाय बाबासाहेबांनी ठेवला; यात प्रांत आणि राज्यांचा

विकास करावयाचा असेल तर केंद्र सरकारला त्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. यामुळे राज्यांच्या व प्रांताच्या स्वाय्यततेला सुद्धा धक्का पोहचणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनात्मक कायद्याच्या ज्ञानाच्या आधारावर श्रम विभागाने असे प्रतिपादन केले की, भारतीय घटना केंद्र सरकारवर कोणत्याही प्रकारची मर्यादा लादू शकत नाही. १९३५ च्या कायद्यात १५०(२) कलमाप्रमाणे संघराज्य कोणत्याही उद्धीष्टसाठी वित्तीय मदत देऊ शकते. भारतीय स्तरावर किंवा काही प्रांतीय स्तरावर खर्च करावयाचा असेल तर सध्याचे प्रांतीय कायदे घटनेशी सुसंगत आहेत. त्यामुळे जलमार्गाच्या विकासासाठी होणार्या खर्चाची जबाबदारी फक्त प्रांतीय सरकारची आहे. केंद्राला किंवा प्रांताला किंवा व्यक्तीला एखाद्या प्रकल्पाचा किती लाभ मिळेल याचे मोजमाप करणे आवश्यक आहे. जलमार्गाच्या, त्याचप्रमाणे नदी प्रकल्प, विद्युत उर्जा, नौकानयन, जलसिंचन, इत्यादी प्रकल्पांमुळे संघराज्याला आणि प्रांतीय सरकारला किती लाभ होईल याचेही मोजमाप करणे आवश्यक आहे. कारण जलसिंचन आणि जलविद्युत निर्मितीपासून होणाऱ्या फायद्याच्या वितरणाच्या बाबतीत अशा प्रकारच्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे घटनेने अनुदान मंजूर करण्याची मध्यावर्ती सरकारला मान्यता दिली आहे.

१९३५ च्या कायद्याच्या काही कलम व पोटकलमाच्या आधारे श्रम विभागाने आणखीन असे स्पष्ट केले की, भारतात जलसाधनसामग्रीचा विकास करण्यासाठी जलसिंचन आणि जलमार्ग मार्गदर्शक मंडळाच्या स्थापनेसाठीच्या खर्चाच्या बाबतीतली तरतूद घटनेच्या १५० (२) पोटकलमामध्ये केली आहे, ती अशी- अशा प्रकल्पाच्या विकासासाठी वित्तीय तरतूद उपलब्ध करण्याची जबाबदारी केंद्र सरकारची आहे. त्याचप्रमाणे सर्वसाधारण नियोजनासाठी जर वित्तीय आयोगाने मान्यता दिली असेल तर मध्यवर्ती सरकार आणि प्रांतीय सरकारमध्ये समन्वय साधने गरजेचे आहे. घटनेमध्ये वित्तीय अनुदानासाठी पाच वर्षाची मर्यादा घालावी अशी तरतूद नाही. म्हणून मंडळाची निर्मिती करणे आवश्यक आहे आणि मंडळाची निर्मिती कायम स्वरुपाची होत असेल तर त्याचा लाभ केंद्र सरकारलाच मिळेल.

डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली श्रमविभागाने जलसिंचन मार्गदर्शक मंडळाची स्थापना स्थापना करण्याच्या संदर्भात अत्यंत प्रखरपणे विचार मांडल्यानंतर वित्त विभागाने शेवटी मंडळाला नियमित वित्तीय मदत देण्याचे तत्वतः मान्य केले. परंतु त्यापूर्वी या प्रस्तावाच्या संदर्भात प्रांतीय सरकारशी संपर्क साधावा असे सुचविले. या अनुषंगाने १५ नोव्हेंबर ते ७ डिसेंबर १९४४ च्या दरम्यान श्रम विभागाने प्रांतीय सरकारशी पत्रव्यवहार केला आणि प्रस्तावित मंडळाचा मसुदा पाठविला. २२ नोव्हेंबर १९४४ च्या आंतरविभागीय मिटींगमध्ये प्रस्तावावर चर्चा करून प्रस्तावाला मान्यता देण्यात आली.

परंतु समस्या अजून संपलेल्या नव्हत्या मंडळाच्या पूर्वीच्या नावात बदल करण्यात आला. 'मध्यवर्ती जलमार्ग, नौकानयन आणि जलसिंचन आयोग' असे नवे नाव ठरविण्यात आले. पर्यायी नावाला मध्यवर्ती नौकानयन आणि जलसिंचन आयोगाचा फारसा अनुकूल प्रतिसाद मिळाला नाही. यामध्ये महत्वाचा दृष्टीकोन असा होता की, सर्वच प्रांतीय सरकारांनी प्रस्तावित आयोगाच्या रचनेला मान्यता द्यावी.

या समस्येवर मार्ग काढणे आवश्यक होते. सर्व प्रांतीय सरकारांना पाठवावयाच्या मध्यवर्ती जलमार्ग, नौकानयन आणि जलसिंचन आयोगाच्या मसुद्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ७ डिसेंबर १९४४ ला मान्यता दिली आणि दुसऱ्याच दिवशी ८ डिसेंबर १९४४ ला प्रांतीय सरकारला पत्र पाठविले.

या पत्रामध्ये श्रमविभागाने म्हटले की, युद्धोत्तर काळातील विकासाला चालना देण्यामध्ये भारत सरकारची महत्वाची जबाबदारी आहे. विद्युत, उद्योग, अन्नधान्याची उपलब्धता आणि पुरवठा आणि समाजाची आर्थिक प्रगती जलसिंचनाच्या प्रगतीवर, जमिनीच्या संवर्धन आणि पूर नियंत्रणावर अवलंबून आहे. वाहतुकीच्या समस्या सोडविण्यासाठी जलवाहतुकीचे योगदान महत्वाचे ठरते. त्याचप्रमाणे जलमार्ग, जलसिंचन, नदीनियंत्रण, संवर्धन, पूरनियंत्रण, जलविद्युत विकास, जमिनीचे संवर्धन, पाण्याचा वाटा इत्यादी समस्या व नौकानयन हे आंतरप्रांतीय /आंतरराज्यीय विषय आहेत. त्यासाठी प्रस्तावित आयोगाची कशी गरज आहे, याबद्दलचे स्पष्टीकरण केले होते. २० डिसेंबर १९४४ पर्यंत आपले प्रांतीय सरकारने आपले मत व्यक्त करावे अशी पत्रात अपेक्षा व्यक्त केली होती.

**तांत्रिक संघटनेची स्थापना:**

अकरा प्रांतीय सरकार पैकी नऊ प्रतिकिया अनुकूल होत्या, तर जवळपास सर्व राज्यांनी मनापासून पाठींबा व्यक्त केला. लगेच श्रमविभागाने आयोगाच्या स्थापनेला होकार दिला. २ फेब्रुवारी ते ३ मार्च १९४५ च्या दरम्यान श्रमविभागाने विशेषतः श्रमविभागाचे सेक्रेटरी एच. सी. प्रायर, उप सेक्रेटरी डी. एल. मुजुमदार, आणि राय बहादूर खोसला यांनी ठरावाचा मसुदा तयार केला. डॉ. आंबेडकरांनी ठरावाच्या मसुद्याला ३ मार्चला आणि सारांशाला ४ एप्रिलला मान्यता दिली. त्याचदिवशी व्हाईसरॉयनी आयोग स्थापन करण्याच्या ठरावाला मान्यता दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अशा तऱ्हेने ४ एप्रिल १९४५ रोजी जल आयोगाची स्थापना केली. ५ एप्रिल १९४५ मध्ये मध्यवर्ती जल आयोग अस्तित्वात आला. मध्यवर्ती जलमार्ग जलसिंचन आणि नौकानयन(CWINC) या प्रस्तावित आयोगाच्या संघटनात्मक रचनेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ८ ऑगस्ट १९४५ ला मान्यता दिली. रॉयबहादूर खोसला ए. एन. हे प्रस्तावित आयोगाचे अध्यक्ष झाले.

अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी असे निदर्शनास आणले की, **१) नोव्हेंबर १९४४ मध्ये** स्थापन करण्यात आलेले **मध्यवर्ती तांत्रिक उर्जा मंडळ** आणि **२) ५ एप्रिल १९४५ रोजी मध्ये** स्थापन केलेले **मध्यवर्ती जलमार्ग,जलसिंचन आणि नौकानयन आयोग (CWINC)** या दोन्हीही संघटना जलसामग्रीचा पर्याप्त वापर करण्यासाठी मार्गदर्शन करतील, त्यासाठी विविध उद्धिष्टांची पूर्तता करण्यासाठी प्रकल्पाची बांधणी कशी करावी यासाठी मार्गदर्शन करतील. या संघटनेच्या आधारावरच नंतरच्या कालावधीमध्ये **मध्यवर्ती जल आयोग** आणि **मध्यवर्ती विद्युत प्राधिकरण मंडळाची** स्थापना झाली.

डॉ. बाबसाहेब आंबेडकर म्हणतात, मला वाटते की आपण योग्य दिशेने वाटचाल करीत आहोत. विभागीय विचार बाजुला ठेवले तर जलमार्गाच्या नवीन धोरणाची पूर्ती करण्यासाठी पुढच्या मार्गाची वाटचाल करू, आणि भारतात गरिबीने ग्रासलेल्या लक्षावधी लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रकल्पाची पायाभरणी करू आणि त्यासाठी सुरुवात करू.

**आर्थिक विकासाचा सिद्धांत:**

आर्थिक १९१८ मध्ये बाबासाहेबांनी लिहलेल्या 'Small holdings in India and their Remedies**'** या प्रभावशाली लेखात त्यांनी आर्थिक विकासाचा सिद्धांत मांडला होता. बाबासाहेबांच्या मते शेतीची कमी उत्पादकता हि अपुऱ्या भांडवली गुंतावणुकीमुळे आहे. शेतीमधील दरडोई उत्पन्न कमी असण्याचे मुख्य कारण म्हणजे लोकसंख्येचा शेतजमिनीवर पडणारा प्रचंड भार होय व त्यामुळे शेतीमधील दरडोई उत्पन्न वाढण्यासाठी शेतीवरील लोकसंख्येचा भर कमी करणे आवश्यक आहे. आणि तो भार फक्त औद्योगिकरणामुळेच कमी होऊ शकतो. औद्योगीकरण हाच शेती विकासाचा पाया आहे.

औद्योगिकरणामुळे शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी होईल. त्यामुळे जमिनीचा आकार वाढेल, दरडोई उत्पन्न वाढेल, बचत वाढेल व भांडवली गुंतवणूक वाढेल आणि वाढत्या गुंतवणुकीमुळे उत्पादकता वाढून शेती अस्थिरतेच्या चक्रव्यूहातून बाहेर पडून आधुनिकीकरणाच्या मार्गावर अग्रेसर बनेल. आणि त्यामुळेच जल धोरण आखत असतांना पूरनियंत्रण, जलसिंचन, नौकानयन, शेतीविकास, जलविद्युत निर्मिती, जलउर्जा धोरण व नियोजन(ग्रीड प्रणाली), औद्योगिकरण या उद्देशातून १९४२ -४६ च्या युद्धोत्तर आर्थिक नियोजनाकरिता डॉ. आंबेडकरांनी जलनीतीचे नियोजन केले. अशाप्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळात आर्थिक नियोजनाची सुरुवात करण्यात डॉ. आंबेडकरांचा फार मोठा वाटा आहे.

**नवीन जल धोरणाचे वैशिट्ये:**

आर्थिक विकासाच्या संदर्भात १९१८ मध्ये डॉ. आंबेडकरांनी जो सिद्धांत मांडला तोच विचार १९४२ च्या आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे निश्चित करण्यात महत्वाचा होता हे दिसून येते. त्यामध्ये शेतीच्या विकासासाठी औद्योगीकीकरणाला मिळालेले प्राधान्य स्पष्टपणे दिसून येते. 'देशाच्या औद्योगीकीकरणासाठी स्वस्त दरात जल-विद्युत निर्माण करणे आवश्यक आहे.' त्यांच्या या विचारांचा प्रभाव भारताचे नवीन जल धोरण ठरवितांना दिसून येतो. नवीन जल धोरणाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होते-

**अ)** जलसंपत्तीविकासासाठी नदी-खोऱ्याच्या आधारावर बहुउद्देशीय दृष्टिकोनाचा स्वीकार;
**ब)** नदी-खोरे प्राधिकरणाच्या संकल्पनेचा स्वीकार व अवलंब;
**क)** विद्युतशक्ती आणि जलसंपत्तीचा नियोजनबद्ध आणि काळजीपूर्वक विकास करण्यासाठी केंद्रठिकाणी तांत्रिक तज्ञ मंडळाची निर्मिती.

उपरोक्त प्रत्येक मुद्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले विचार व्यक्त केले.

**युद्धोत्तर आर्थिक पुनर्रचना योजना आणि डॉ. आंबेडकरांचे योगदान:**

दुसऱ्या महायुद्धाच्या परिणामामुळे युरोप, आशिया मधील इत्यादी अनेक देशांच्या भौतिक सेवा- सुविधा आणि औद्योगिक संयंत्राचा विध्वंस झाला. याचा काळात १९४२ -४६ मध्ये 'युद्धोत्तर आर्थिक पुनर्रचना योजना'(Post-War Reconstruction Plan) केंद्र सरकारने जाहीर केली. या योजनेसाठी सरकारने ५ सदस्यांची एक समिती गठीत केली. डॉ. आंबेडकर हे या समितीमध्ये एक सभासद होते तर दुसरीकडे श्रम, जल व विद्युत मंत्रालयातही 'धोरण समितीचे' अध्यक्ष होते. या दोन्हीही महत्वाच्या समितीवर बाबासाहेब असल्यामुळे युद्धोत्तर पुनर्रचना व नियोजनाची भूमिका व उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात बाबासाहेबांचा फार मोठा वाटा होता. ह्या संदर्भात बाबासाहेबांचे योगदान मुलभूत स्वरूपाचे आहे, ते म्हणजे-

१)१९४२ -४६ ह्या काळातील युद्धोत्तर पुनर्रचना नियोजनाच्या निमित्ताने प्रथमच आर्थिक नियोजनाची भूमिका व उद्दिष्ट्ये निश्चित करण्यामध्ये मदत व मोठा सहभाग.
२) केंद्रामध्ये प्रथमच जल व विद्युत विकासासाठी निश्चित धोरण व नीती तयार करणे.
३) केंद्रामध्ये प्रथमच जल व विद्युत विकासासाठी प्रशासकीय यंत्रणा व संघटना निर्माण करणे.
४) दामोदर, हिराकुंड, व सोनसारख्या जलविकासाच्या धोरण योजनेची सुरुवात करणे.
५) भारतीय घटनेत आंतरराज्यीय नद्यांच्या विकासासाठी योग्य त्या कायद्याची तरतूद करणे.

**भारतीय संविधानात जल नीतीची तरतूद:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेतून नदी खोरे प्राधिकरण स्थापन झाले. याचे पुन्हा प्रतिबिंब स्वतंत्र भारताच्या संविधानात दिसून येते. डॉ.आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष. २१ फेब्रुवारी १९४८ रोजी बाबासाहेबांनी भारताच्या स्वतंत्र जल धोरणाचा मसुदा तयार केला. १९३५ च्या भारत सरकारच्या कायद्यातील विभाग १३० -१३४ मध्ये असलेली कलमे संविधान मसुद्यात कलम २३९ ते २४२ अशी घालण्यात आली. या कलमात पूर्वीचीच शब्दरचना " कोणत्याही स्त्रोता-मार्गे मिळणारे पाणी" नव्या मसुद्यातही तशीच ठेवण्यात आली. परंतु प्रांतांकडे / राज्यांकडे 'आंतरराज्य जलमार्ग' हा विषय न ठेवता केंद्र सूचित समाविष्ट करण्यात आला.

कलम ७४ नुसार (परिशिष्ट १४ – १५) ' पूरनियंत्रण, जलसिंचन, नौकानयन व विद्युत जलऊर्जा याकरिता आंतरराज्य जलमार्गाचा विकास' हा केंद्रसूचित समावेश करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १सप्टेंबर, १९४९ रोजी संसद सभागृहामध्ये ७४ व्या नोंदीत दुरुस्ती सुचविली. प्रस्तावित ७४ नी नोंद अशी होती- 'सार्वजनिक हिताच्या दृष्टीने जलद कृती करण्यासाठी केंद्र सरकार किंवा संसदेच्या कायद्यानुसार आंतरराज्य नद्यांचे नियमन व विकास साध्य करण्यात येईल.' हि घटनेतील ५६ वी नोंद म्हणून पहिल्या सूचित समाविष्ट करण्यात आली.

घटना मसुद्यातील २० वी नोंद राज्यासूचीमध्ये होतीच, त्यामध्ये कोणताही बदल सुचविण्यात आला नाही. घटनेच्या दुसऱ्या सूचीमध्ये ती १७ वी नोंद म्हणून स्वीकारण्यात आली. त्यानुसार, जल म्हणजेच जलपुरवठा, सिंचन, कालवे, निस्सारण आणि पाटबंधारे, जलसाठाआणि जलउर्जा हे सूची १ मधील घटक ५६ च्या तरतुदीनुसार नियंत्रित केले जाईल.

भारतीय संविधानाच्या मसुद्यातील कलम २३९ ते २४२ यामध्ये डॉ. आंबेडकर यांनी ९ सप्टेंबर १९४९ रोजी सुधारणा सुचविली आणि २४२ अ हे कलम घातले. ते पुढीलप्रमाणे होते, "आंतरराज्य नद्या किंवा खोरे यांच्या वादासंदर्भात लवाद नेमण्याबाबत." परंतु डॉ. आंबेडकरांच्या मते, "मसुद्यातील मुळ तरतूद फारच ढोबळ आणि साचेबंद असल्याने कोणतीही अशी आवश्यक कृती करणे किंवा निर्णय घेणे शक्य होत नाही. त्यामुळे असा अधिकार संसदेला देणारे नवे कलम घालण्याची सूचना मी करीत आहे." हे मसुद्यातील कलम पुढे अनुच्छेद २६२ म्हणून स्वीकारण्यात आले. या अनुच्छेदानुसार - 'आंतरराज्यीय नद्यांच्या किंवा नदीखोऱ्यातील पाण्यासंबधीच्या तंट्याचा अभिनिर्णय.' अशी भारतीय संविधान तरतूद करण्यात आली. (Article-262 Disputes relating to water- '**Adjudica**Adjudication of disputes relating to waters of inter-State rivers or river valleys'**)**या तरतुदीनुसार भारतीय संसदेने १९५६ मध्ये आंतरराज्य जलविवाद कायदा आणि १९५६ मध्ये नदी मंडळ कायदा केला.

**समारोप:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भारताच्या जलविषयक धोरणावर वैज्ञानिक, वस्तुनिष्ठ, अभ्यासू आणि मूलतः मानवतावादी दृष्टिकोनाचा प्रभाव होता. डॉ. आंबेडकरांचे योगदान लक्षात घेऊनच सी. एच. भाभा यांनी १९४६ मध्ये डॉ. आंबेडकरांकडून या पदाचा पदभार स्वीकारला, त्यावेळेस खालील त्यांनी बाबासाहेबांविषयी उद्गार काढले- 'अल्पावधीत आपण जुन्यापुराण्या संकल्पनातून अत्याधुनिक अशा जलविकास संकल्पनेकडे वळलो आहोत आणि त्यासाठी नदीखोरे विकासाचा विस्तृत नियोजन आराखडा तयार केला आहे. याबाबत दामोदर नदीसंबधी घेण्यात आलेली पहिली परिषद माझ्या दृष्टीने अतिशय महत्वाची ठरते. कारण या परिषदेनेच मार्गदर्शनाचे काम केले आहे . त्यातूनच महानदी, कोसी सोन नदी प्रकल्प तयार झाला. या संदर्भात बहुउद्देशीय आणि प्रादेशिक विकासाचे प्रकल्प ज्यांनी तयार केले त्यांचे आम्ही ऋणी आहोत.'

प्रोफेसर एच. सी. हर्ट यांनी आपल्या 'New india's Rivers' ह्या पुस्तकात डॉ. आंबेडकरांच्या या योगदानाविषयी दामोदर धरणासंबंधात असे स्तुतिपर शब्द काढले- 'खोऱ्या पावसाचे पाणी किती उपलब्द होईल व त्याचे नियोजन कसे करावे इत्यादी प्रश्नांची सोडवणूक इंजिनिअर मंडळी करू शकली. परंतु इतर कठीण प्रश्न मुख्यतः राजकीय स्वरूपाचे होते. तेथील रहिवाश्यांची इच्छ्या, प्रांतीय सरकारे बिहार व बंगाल यांची बहुउद्देशीय दामोदर खोरे विकासाच्या बाबतीत मान्यता, तसेच खर्चाचे विवरण इत्यादी प्रश्न हे राजकीय स्वरूपाचे होते. साधारणतः ३० महिने दामोदर धरणाच्या नियाजानाचे काम राजकीय व्यक्तीच्या हातात केंद्रित झाले. ज्या व्यक्तीने दामोदर खोरे विकासाच्या बाबतीत राजकीय अर्थाने निर्णय घेतला

ती व्यक्ती म्हणजे डॉ. आंबेडकर. ज्या व्यक्तीने दामोदर खोऱ्याचा मसुदा संसदेत मान्य करून घेतला ती व्यक्ती म्हणजे न. वि. गाडगीळ (नवी बांधकाम, खाणी व उर्जामंत्री).'

थोडक्यात भारतातील जल व उर्जानियोजन ह्यांची पायाभरणी करण्याचे श्रेय डॉ. आंबेडकरांना जाते. स्वातंत्र्यपूर्व भारतात आधुनिक जल धोरणाच्या बाबतीत डॉ. आंबेडकरांचे हे महत्वपूर्ण योगदान भारताला नेहमीच मार्गदर्शक ठरत राहील. वर्तमान स्थितीत उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या(LPG) प्रकियेत भारतातील जाती व्यवस्थेमुळे (caste system) अस्तित्वात असलेला जातीय भांडवलवाद (Caste Capitalism) जो ब्राम्हणवादावर आधारित आहे; त्याला नष्ट करून भारतीय

संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता हि तत्वे खऱ्या अर्थाने प्रस्थापित करणे हे देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ:**

१) थोरात, सुखदेव, (२०१०) बाबासाहेब आंबेडकर: नियोजन, जल व विद्युत- भूमिका व योगदान(मराठी अनुवाद), द्वितीय आवृत्ती-२०१०, सुगावा प्रकाशन पुणे(म.रा.) भारत.

२) Thorat, Sukhadeo, Ambedkar's Role in Economic Planning, Water and Power Policy, 2006, ISBN:81-7541-323-9, published by shipra publication, New Delhi, India.

३) Ambedkar, Dr. B.R., Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches, Vol. 10; First ed., Oct.1991, LCCC NO.79-905592, IE-33622 Bombay: Education Department, Government of Maharashtra, 1991, India.

४) Mankar, Vijay, Dr. Ambedkar Plan of Individual, Society, State and Nation 1st Amended Edition, Compiled & Drafted 14 April, 2012 CE (BE 2555, AE116), AIMBSCS-Blue World Series, Nagpur (M.S.), India.

५) 'Constitution of India' (द्विभाषी आवृत्ती English-Marathi), सातवी आवृत्ती: २६जानेवारी, २०१४, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई (म.रा.), भारत

६) Mankar, Vijay, Ambedkarism in the era of globalization and beyond……..,First ed., 26th June, 2011CE (B.E.2554, A.E.120, Saka 1932) ISBN 978-81-907085-3-1, AIMBSCS-Blue World Series, Nagpur(M.S.),India.

---

(Caste (caste system)) Thorat, Sukhadeo, योजना'(Post-war Reconstruction Plan) Ambedkar's Role in Economic Planing, Water and Power Policy,2006,INBN:81-7541-323-9,published shipra publication, New Delhi,India. Ambedkar systems) (Post-War Reconstruction Plan)ystem)